PN009374

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

1

**IMPORTANT INSTRUCTIONS:** ...PAGE. 2. THIS SHEET WILL BE SCANNED BY COMPUTER. THEREFORE, (1) Use DARK BLACK BALL POINT PEN for writing. (2) D... ...) Do not Tamper with BAR-CODE. (5) Write in English only.

## श्री. सतीश चव्हाण यांचा पेपर

| FOR THE USE OF EXAMINER ONLY | | FOR THE USE OF MODERATOR ONLY | | FOR THE USE OF CHIEF MODERATOR ONLY | |
|---|---|---|---|---|---|
| Q.No. | MARKS | Q.No. | MARKS | Q.No. | MARKS |
| 1 | 19 | 1 | 18 | 1 | |
| 2 | 10 | 2 | 10 | 2 | |
| 3 | 06 | 3 | 07 | 3 | |
| 4 | | 4 | | 4 | |
| 5 | | 5 | | 5 | |
| 6 | | 6 | | 6 | |
| 7 | | 7 | | 7 | |
| 8 | | 8 | | 8 | |
| 9 | | 9 | | 9 | |
| 10 | | 10 | | 10 | |
| Total | 35 | Total | 35 | Total | |
| Signature of Examiner | | | | Signature of Chief Moderator | |

## भाषा लिहावी नेटकी by संदिप जाधव

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

उमेदवाराने या पृष्ठावर काहीही लिहू नये.

CANDIDATE-DO NOT WRITE ANYTHING ON THIS PAGE



उमेदवाराने कच्चे काम / टिप्पण्या / हिशेब करण्याकरिता फक्त या पृष्ठावरील खालील जागेचाच वापर करावा.

www.mpscmaterial.com  follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

उमेदवाराने कच्चे काम / टिप्पण्या / हिशेब करण्याकरिता फक्त या पृष्ठावरील खालील जागेचाच वापर करावा.



# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## SPECIAL SHEET FOR PRECIS

**DO NOT WRITE YOUR ROLL NUMBER OR ANYTHING ON THIS SHEET**

**Use both sides of this sheet. Write one word in each block. Punctuate your passage in the usual way and divide it into paragraphs, if necessary, leaving a line blank at the end of each paragraph.**

Q. 3

Title: प्रबोधनकाळातील मानवतावादी आंदोलन

Do not write on this margin

मानव शिक्षणाने बदलणारा व विकसित होणारा प्राणी आहे, त्यादृष्टीने त्याचे भवितव्य ~~वाव्य~~ त्याच्याच हातात आहे. इतिहास निर्माण करणे वा बदलणे याची शक्ती त्याच्यात आहे. मानवच सर्व मापदंडाचा मानदंड आहे. मानवी जीवनमूल्ये ही मानवतावादी आंदोलन व तत्वज्ञानाची अंतिम मूल्ये होत. मध्ययुगीन प्रबोधनकाळात धार्मिक (ख्रिश्चन) बंधनातून मुक्त झालेल्या व्यक्तींमुळे मानवाला नवी दिशा प्राप्त झाली. या व्यक्तींनी प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीतून प्रेरणा घेत स्वतःचा इतिहास घडवायला सुरुवात केली. काव्य, नाटक, कला, तंत्रविज्ञान, शिक्षण यांना नवी दिशा मिळाली. धार्मिक (ख्रिस्ती) चौकटीत न बसणारा मानवी ~~ऐक~~ ऐहिक जीवनमूल्यावर भर देणारा शिक्षणाचा कार्यक्रम हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य.

उताऱ्यातील शब्दसंख्या = २२५

१/३ सारांश मधील शब्दसंख्या = ~~७~~ ८२

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

उमेदवारांनी या चौकटीत काहीही लिहू नये.

| Q. No. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 02 | Examiner | 10 | + | + | + | + | + | = | 10 |
| | Moderator | 10 | + | + | + | + | + | = | |

Q. No. प्र.क्र. 2

वाफेचे इंजिन

वाफेचे इंजिन हे औद्योगिक क्रांतीचे प्रतिक आहे. इजिप्तमधील अलेक्झांड्रिया या शहरातील ~~काही व्यापाऱ्यांनी~~ व्यापाऱ्याने वाफेमध्ये शक्ती असते हे पहिल्या ~~दशकात~~ शतकात दाखवून दिले. त्याने बनवलेल्या उपकरणामध्ये दोन जोडलेल्या नळ्यामधून येणारी वाफ एका लंबदंडगोल धातूच्या नळीत साठवली जात होती. या साठवलेल्या वाफेमुळे लंबदंडगोल स्वतःभोवती फिरत होता. औद्योगिक वापर व्हायला मात्र सोळावे शतक उजाडले. १६९८ मध्ये थॉमस सेवरी ~~याने~~ याने खाणीतून पाणी बाहेर काढणारे वाफेचे इंजिन इंग्लंडमध्ये बनवले. यामध्ये पाण्याचा दाब एका टाकीत मोकळा होत होता. पाणी थंड होत असताना उत्सर्जनाचा वापर झाल्याने वाफेचे प्रमाण कमी होत होते. याचा वापर खाणीतून पाणी काढण्यासाठी होत होता. हे इंजिन सतत चालू राहत नसे. जरी हे काही पाणी काढत असले तरी यात इंधन म्हणून खूप कोळसा लागे. १७१२ मध्ये थॉमस न्यूकमन ने ~~याने~~ या इंजिनामध्ये ~~इंग्लंडमध्ये~~ इंग्लंडमध्ये बदल केला. त्याने सिलिंडर वापरला व त्याखाली उकळत्या पाण्याची टाकी ठेवली त्यामुळे सिलिंडरला एकसारखी वाफ मिळू लागली. यामध्ये त्याने पाणी काढण्यासाठी पंपाचा वापर केला. परंतु यामध्ये पाणी जास्त उकळल्यानंतर सिलिंडर जास्त गरम होत असे व त्यामुळे इंजिनाची कार्यक्षमता कमी मिळे. १७६५ मध्ये जेम्स वॅटने इंजिनामध्ये वाफेच्या वेगळ्या टाकीचा वापर केला. ही टाकी ~~आधी~~ बाष्पीभवन होत असलेल्या टाकीपासून दूर असे. त्यामुळे तापमान कमी झाले.

Q.No. TO BE USED BY CHIEF MODERATOR ONLY

| Q.No. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | + | | + | | + | | = | |

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

| Q. No. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Examiner | | + | | + | | + | | = | |
| | Moderator | | + | | + | | + | | = | |

Q. No.
प्र.क्र.

उष्णतेच्या अनुपस्थिती मुळे वाफेचे पाण्यात रुपांतर करणे सोपे झाले व कोळशाचा वापर अध्यविर आला.
जेम्स वॅटने केलेल्या या बदलामुळे यांत्रिकी पध्दतीने चाक फिरवणे सोपे झाले. यानंतर बऱ्याचशा बदलानंतर या इंजिनाचा कापड ते खाण इ. उदयोगात प्रवेश झाला. याच इंजिनाने रेल्वेचा सुध्दा पाया घातला.

१० 

10

भाषा लिहावी नेटकी





| Q. No. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Examiner | 19 | + | | + | | + | | = | 19 |
| | Moderator | 18 | + | | + | | + | | = | |

Q. No.
प्र.क्र.

1

Q. NO 1

b) जगाचा पोशिंदा (शेतकरी) आत्महत्येचा विळख्यात

४ जानेवारी २०१९. सकाळची वेळ होती. सहज पेपर चाळत होतो तर पहिल्याच पानावर बातमी होती, 'शेतकरी विधवा श्रीमती वैशाली यांच्या हस्ते अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन!' क्षणभर सुन्न झालो. मनात विचार आला, हा कसला सन्मान? दुर्दशेचा? या सगळ्यात माझे मन मात्र पहिल्या दोन शब्दावरच केंद्रित झाले, 'शेतकरी विधवा'. हळूहळू आजवर वर्तमानपत्रात वाचलेले, टीव्हीवर पाहिलेल्या गोष्टी समोर येऊ लागल्या.

ज्याला आपण जगाचा पोशिंदा म्हणतो तो आजच्या काळात का आत्महत्या करत आहे. या आत्महत्या आधीच्या काळापासून होत होत्या का? नाही. मग आताच का होत आहेत? आपल्याला याचे वेगवेगळे कालखंड दिसतात.

इंग्रज येण्यापुर्वी गावे स्वयंपूर्ण होती. त्या काळात शेतकरी आत्महत्या झाल्या असा कुठे उल्लेख आढळत नाही. शेतकऱ्याची दुर्दशा इंग्रज आल्यानंतर चालू झाली. करपध्दती, पीकपध्दती, मालकी हक्क बदलले. शेख शेतसारा, नगदी पीके लावण्याची सक्ती, काही प्रांतात जमीनदारी पध्दत इ. मुळे शेतकरी तोट्यात जाऊ लागला. यातूनच शेतकऱ्यांचे उठाव झाले. तरीदेखील या कालखंडात आत्महत्या विशेषकरुन दिसून येत नाहीत.

स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून कृषीवर भर दिला गेला. १९६५-६६ ला हरितक्रांती झाली. उत्तर भारतात ही क्रांती विशेषकरुन यशस्वी झाली. हळूहळू देश



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

Q. No.

Examiner

Moderator

Q. No. प्र.क्र.

अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. तरीदेखील हरितक्रांती ही सगळीकडेच यशस्वी झाली असे नाही. महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश इ. राज्ये या क्रांतीच्या लाभापासून दूर राहिली. येथील शेतकऱ्यांची १९९१ च्या उदारीकरणानंतर अजूनच दुर्दशा होऊ लागली.

शेतकरी आत्महत्येची कारणे –

① स्वातंत्र्योत्तर काळात शेतीचा समप्रमाणात सर्व देशात विकास न होणे. हरितक्रांतीचा लाभ सगळीकडे न मिळणे अर्थात या क्रांतीचा लाभ मिळालेल्या पंजाब, हरयाणा या राज्यातही आज आत्महत्या होत आहेत. वाढीव उत्पादनखर्च, कमी मोबदला इ. याची कारणे आहेत.

② वाढत्या लोकसंख्येमुळे एकाच कुटुंबाची जमीन वाटणीमुळे अनेक कुटुंबात विभागली गेली. कमी धारणाक्षेत्रात शेती करणे परवडेना. यातील काही शहराकडे स्थलांतर झाले जे शेती करत राहिले त्यांना शेती करताना सावकारी कर्ज, कमी मोबदला, निसर्गाचा लहरीपणा, शेती उत्पादनाचा कमी मोबदला इ. समस्येशी सामना करावा लागला. त्यातून ते काही आत्महत्येस प्रवृत्त झाले.

③ याला काही सामाजिक कारणेदेखील आहेत. हुंडापध्दती, भाऊबंदकीमुळे कमी धारणाक्षेत्रात सहकारी शेती न करणे. लग्न समारंभ, जत्रा इ. कारणावर खर्च केल्याने काही शेतकरी कर्जबाजारी झाले.

④ नवीन तंत्रज्ञानपध्दतीचा अभाव, कमी उत्पादन देणारी बियाणे, शेअरबाजारामुळे शेतकऱ्याला मिळणारा कमी मोबदला इ. कारणेही शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त करतात.

Q.No.

TO BE USED BY CHIEF MODERATOR ONLY

+ + + =



Q. No.

Examiner

Moderator

Q. No. प्र.क्र.

शेतकरी आत्महत्येवरील उपाय –

① अलीकडे लोकप्रिय झालेला उपाय म्हणजे कर्जमाफी. अर्थात हा काही कायमस्वरूपी उपाय नव्हे. तसेच याचा सर्व शेतकऱ्यांना फायदा मिळत नाही. लघु व सीमांत शेतकऱ्यांकडे संस्थात्मक कर्जाचे प्रमाण कमी असते. त्यामुळे हा शेतकरी कर्जमाफीतून वगळला जातो, आणि याच शेतकऱ्याचा वर्ग हा जास्त आत्महत्याग्रस्त आहे. यांच्यावर सावकारी कर्जाचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे सावकारी कायद्याची कडक अंमलबजावणी करणे हा शाश्वत उपाय होऊ शकतो.

② दुष्काळ, अतिवृष्टी या समस्यांना तोंड देण्यासाठी सरकार व शेतकरी दोन्ही पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. दुष्काळासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर करणे. दुष्काळविरोधी बियाणे व वनस्पती तयार करणे. अतिवृष्टी सारख्या संकटाची ~~म~~ पूर्वकल्पना मिळण्यासाठी महावेध सारखी यंत्रणा सर्वत्र बसवणे. नुकसान झालेल्या ~~शेत~~ शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना सारख्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे. जेणेकरून शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होणार नाहि.

③ नवीन HYV बियाणे विकसित करणे. शेअरबाजारात्ला आळा घालून शेतकऱ्याला त्याच्या मालाचा योग्य भाव मिळवून देणे. किमान आधारभूत किंमत यासारख्या योजनांची ~~क~~ नीट अंमलबजावणी करणे.

④ ज्या ठिकाणी आत्महत्या जास्त होतात उदा. विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी सरकारी यंत्रणा व NGO यांच्या सहाय्याने समुपदेशन करून लोकांना आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करणे.

Q.No.

TO BE USED BY CHIEF MODERATOR ONLY

+ + + =

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

उमेदवारांनी या चौकटीत काहीही लिहू नये.

Q. No. Examiner ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

Moderator ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

Q. No. प्र.क्र.

शेतकरी जगणे ही आपल्या सर्वांची गरज आहे. त्याला कर्जमाफी नकोय तर उत्पादनाला योग्य भाव हवा आहे. शेती टिकली तर गावे राहतील शहरावर ताण पडणार नाही. ग्रामीण शहरी समतोल साधला जाईल. हवामानबदलाच्या या युगात शेती टिकवणे व शेतकऱ्याला आत्महत्येच्या विळख्यातून बाहेर काढणे ही समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. आणि पुन्हा कधी ~~से~~ श्रीमती वैशाली यांच्यासारख्या महिलेला 'शेतकरी विधवा' म्हणून उद्घाटन करण्याचा मान न मिळो.

१५

(18)

भाषा लिहावी नेटकी

Q.No. ☐

TO BE USED BY CHIEF MODERATOR ONLY ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐



उमेदवारांनी या चौकटीत काहीही लिहू नये.

Q. No. Examiner ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

Moderator ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

Q. No. प्र.क्र.

CHECK ALL PAGES ARE ...

Q.No. ☐

TO BE USED BY CHIEF MODERATOR ONLY ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## -: उमेदवारांना सूचना :-

**प्रस्तुत उत्तरपुस्तिकेवरील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात आणि त्यांचे कटाक्षाने पालन करावे, अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन करण्यात आले, असे समजून संबंधितांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल.**

१. उत्तरपुस्तिका प्राप्त झाल्यानंतर प्रथम उत्तरपुस्तिकेची पाने व शिलाई बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करूनच उत्तरपुस्तिका वापरण्यास सुरुवात करावी. उत्तरपुस्तिका सदोष असल्याचे आढळल्यास ती, पेपर सुरु होण्यापूर्वी रद्द करून दुसरी उत्तरपुस्तिका घ्यावी.

२. या उत्तरपुस्तिकेत उत्तरे लिहिण्यासाठी असलेल्या अथवा इतर कारणांसाठी दिलेल्या पृष्ठांपैकी कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा भाग फाडू नये, अथवा त्यास अधिक पृष्ठे जोडू नयेत. जर दिलेली उत्तरपुस्तिका कमी पृष्ठांची किंवा खराब झालेली असेल तर ही बाब पेपर सुरु होण्यापूर्वी पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आणावी.

३. उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर विहित ठिकाणी आपला बैठक क्रमांक व इतर आवश्यक तपशील नमूद करावा. विहित ठिकाणाव्यतिरिक्त इतरत्र कोठेही परीक्षा क्रमांक अथवा अन्य कोणताही तपशील लिहू नये.

४. उत्तरपुस्तिकेची मुखपृष्ठे (पृष्ठ क्रमांक १ व २) खराब करू नयेत, अथवा त्यावर विहित ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र कोणत्याही प्रकारचे लिखाण करु नये.

५. उत्तरपुस्तिकेत प्रश्नाच्या वास्तविक उत्तराव्यतिरिक्त कोठेही नांव व बैठक क्रमांक किंवा इतर अनावश्यक मजकूर लिहू नये. तसेच कोणत्याही नावाने स्वाक्षरी करु नये अथवा अन्य कोणतेही चिन्ह काढू नये किंवा ओळख पटविण्यासाठी कोणत्याही प्रकारची सांकेतिक खूण करु नये.

६. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पृष्ठावर सुरु करावे.

७. प्रत्येक उत्तराच्या आरंभी त्याचा प्रश्न/उपप्रश्न क्रमांक डाव्या बाजूला समासात न चुकता सुवाच्य अक्षरात काटेकोरपणे नमूद करावा.

८. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरा अखेर उत्तर संपल्याच्या निदर्शनार्थ एक आडवी रेषा ओढावी.

९. उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडविल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

१०. कोणत्याही प्रश्नांचे उत्तर एकापेक्षा अधिकवेळा लिहू नये. चुकीने कदाचित असे लिहिले गेले, तर ज्याचे मुल्यांकन करू नये, असे वाटत असलेले उत्तर रद्द करावे. उत्तराचा काही भाग खोडलेला असेल, अथवा त्यावर रेघ मारली असेल, तर तेथे 'रद्द केले' असे लिहावे मात्र स्वाक्षरी करू नये.

११. उत्तर समाप्त झाल्यानंतर त्या पृष्ठावर मोकळ्या राहिलेल्या जागेखेरीज मधले कोणतेही पृष्ठ कोरे सोडू नये. अनावधानाने कोऱ्या राहिलेल्या पृष्ठांवर काट मारावी.

१२. उत्तरपुस्तिकेत उत्तरे पाठोपाठ लिहा. नजरचुकीने एखादे पृष्ठ कोरे राहिल्यास त्यावर "कृपया पृष्ठ उलटा" असे लिहा.

१३. आयोगाकडून उमेदवारांना परीक्षेच्या वेळी पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे. मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

१४. कच्च्या टिप्पण्या अथवा हिशेब करण्यासाठी आयोगाने विहित केलेल्या पृष्ठाचाच वापर करावा तसेच मागाहून त्या टिप्पण्या व हिशेब रद्द करावेत. परंतु या ठिकाणी पर्यवेक्षक/समवेक्षक यांच्या स्वाक्षरीची गरज नाही.

१५. कोणतेही लिखाण रद्द करावयाचे असेल, तर त्यावर स्वतः पूर्ण फुली मारावी व 'रद्द केले' असे मोठ्या ठळक अक्षरात लिहावे.

१६. प्रश्नपत्रिकेवर, प्रवेशपत्रावर किंवा सुट्या कागदावर कोणत्याही प्रकारे अथवा कोणत्याही उद्देशाने कोणताही अनावश्यक मजकूर लिहू नये. असे केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल.

१७. परीक्षा सुरु असताना संबंधित विषयाचे/पेपरचे कागद, मुद्रित पेपर, डायऱ्या, वह्या, टिप्पण्या, मार्गदर्शिका, पुस्तकातील पृष्ठे, नकाशे, पुस्तके इत्यादी अनधिकृत साहित्य स्वत:जवळ बाळगणे, कपड्यावर, हातावर किंवा शरीराच्या कोणत्याही भागावर काहीही लिहून आणणे, इत्यादीकरीता सक्त मनाई आहे. नक्कल साहित्याचा वापर उत्तरपुस्तिकेत केला असो अथवा नसो, अशा उमेदवारांवर आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन केले, असे समजून आवश्यक कारवाई करण्यात येईल.

**आपले भवितव्य उज्वल आहे. ते खराब करु नका.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial